जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

दैनिक | वर्ष १ | अंक १९९ | गुरुवार, १२ फेब्रुवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210



## ओझरमध्ये बिबट्याचा दोन भावांवर हल्ला

**नाशिक, ता. ११ :** नाशिक जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून बिबट्यांच्या हालचाली वाढल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे ग्रामीण भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सिन्नर, इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, कळवण, देवळा आणि सटाणा या भागांत बिबट्यांचे दर्शन होत असल्याच्या घटना समोर आल्या आहेत. काही दिवसांपूर्वी नाशिक शहरातही बिबट्या आढळल्याची चर्चा होती.

मंगळवारी (ता. १०) दुपारी साडेबारा वाजता चांदवड तालुक्यातील खडक ओझर परिसरात बिबट्याने दोन भावांवर हल्ला केल्याची घटना घडली. विष्णू वस्ती शिवारात हे दोघे भाऊ कांद्याच्या पिकांना पाणी देत होते. त्यावेळी अचानक बिबट्या समोर आला आणि त्यांच्यावर झडप घातली. या हल्ल्यात बबन मोतीराम पगार वय ५६ आणि नंदू मोतीराम पगार वय ५० हे दोघे जखमी झाले.

घटनेची माहिती मिळताच जवळील शेतकरी मदतीला धावून आले. लोकांची चाहूल लागताच बिबट्या तेथून पळून गेला. जखमी भावांना तातडीने वडाळीभोई येथील आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत आणि प्रकृती स्थिर असल्याचे सांगितले जात आहे.

या भागात द्राक्षबागा मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामुळे दाट झाडांमुळे बिबट्यांना लपण्यासाठी जागा मिळते. अनेक शेतकरी रात्री पिकांना पाणी देण्यासाठी शेतात जातात. अशा वेळी बिबट्याचा धोका वाढतो. स्थानिकांच्या मते या परिसरात दोन बिबटे फिरत आहेत.

वन विभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, पिंजरे लावावेत आणि गस्त वाढवावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी त्वरित पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# कदमवाकवस्ती येथे ज्येष्ठ नागरिकाला लुटणाऱ्या चार आरोपींना अटक

## दीड लाखांचा मुद्देमाल जप्त; लोणी काळभोर पोलिसांची कामगिरी

**लोणी काळभोर, ता. ११ :** वॉकिंगसाठी बाहेर पडलेल्या एका सेवानिवृत्त कर्मचाऱ्यावर चार जणांच्या टोळक्याने प्राणघातक हल्ला करून मोबाईल लुटल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना कदमवस्तीवाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील जाचक वस्ती परिसरात ८ फेब्रुवारीला सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेत सेवानिवृत्त कर्मचारी गंभीर जखमी झाले आहेत. तर गुन्हा दाखल होताच, लोणी काळभोर पोलिसांनी आरोपीच्या ८ तासाच्या आता मुसक्या आवळल्या आहेत.



सुजल बाळासाहेब झेंडे (वय २०, गुरुदत्त कॉलनी, भेकराईनगर), शुभम संजय चव्हाण (वय २४, साडेसतरा नळी, गोसावी वस्ती), ओंकार अशोक चिंतलु (वय ३१, आनंदनगर सोसायटी, जुना कॅनल शेजारी) आणि अभिजीत सतीश सोनकांबळे (वय २०, पांडवदंड रोड, सात देवी मंदिराम ागे, कदमवाकवस्ती, ता. हवेली) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. आरोपींना अटक केल्यानंतर न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपींना गुरुवार (ता.१२) पर्यंत दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

पोलिसांनीदिलेल्यामाहितीनुसार, फिर्यादी महादेव रामभाऊ कापसे (वय ६३, रा. कवडी गाव रोड, रेल्वे गेट शेजारी, लोणी काळभोर) हे आपल्या मित्रासोबत रिव्हरव्ह्यू सिटी मागील रेल्वेलाईन परिसरात मोकळ्या जागेत चालायला गेले होते. तेव्हा चार अनोळखी इसम मोटारसायकलवर येऊन त्यांच्याजवळ थांबले. आरोपींनी शिवीगाळ करत खिशातील मोबाईल व पैसे काढ अशी धमकी दिली. पैसे नसल्याचे सांगताच आरोपींनी झटापट करत दगड, पाईप व दांडक्याने कापसे यांच्या डोक्यात व अंगावर बेदम मारहाण केली. या हल्ल्यात कापसे बेशुद्ध पडले. आरोपींनी त्यांचाजवळील सुमारे सात हजार रुपयांचा मोबाईल हिसकावून घेऊन पळून गेले.

या प्रकरणी महादेव कापसे यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार चार अनोळखी आरोपींच्या विरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३५२, ३०९ (६), ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक (गुन्हे) स्मिता पाटील यांनी पोलीस उपनिरीक्षक अनिल जाधव व त्यांच्या सहकाऱ्यांचे एक पथक तयार केले. आणि गुन्हा उघडकीस आणून आरोपींना अटक करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

सदर गुन्ह्याचा तपास करत असताना पथकाने परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासली असली. वरील चार आरोपींची नावे निष्पन्न झाली. पोलीस आरोपींच्या मागावर होते. परंतु, गुन्हा घडल्यापासून आरोपी हे फरार झाले होते. मात्र पोलिसांना आरोपी हे गंगानगर परिसरात असल्याची खात्रीशीर माहिती एका खबऱ्याने दिली. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलिसांनी वेळ न दडवता तत्काळ त्या ठिकाणी सापळा रचून अवघ्या आठ तासाच्याआत आरोपींना मोठ्या शिताफीने अटक केली.

दरम्यान, चारही आरोपींना ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता, आरोपींनी वरील गुन्हा केल्याची पोलिसांना कबुली दिली आहे. पोलिसांनी आरोपींकडून गुन्ह्यात चोरलेला मोबाईल व गुन्हा करतेवेळी वापरलेल्या दोन दुचाकी असा १ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल व हस्तगत केला आहे. तर चारही आरोपींना न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने आरोपींना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. लोणी काळभोर पोलिसांनी अवघ्या ८ तासाच्या आत गुन्ह्याची उकल करून आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. त्यामुळे लोणी काळभोर पोलिसांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

ही उल्लेखनीय कामगिरी पुणे शहर पोलीस उपायुक्त राजकुमार शिंदे, सहायक पोलीस आयुक्त अनुराधा उदमले, लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक (गुन्हे) स्मिता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अनिल जाधव, पोलीस हवालदार रामकृष्ण वणवे, अण्णा माने, सागर जगदाळे, संभाजी दिवेकर, अंमलदार सुरज कुंभार, सचिन सोनवणे, राहुल कर्डिले, प्रदीप धडस, अशोक गिरी, प्रशांत सुतार व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली.

## लाडक्या बहिणींच्या खात्यात सहा हजार रुपये जमा होणार?

**पुणे, ता. ११ :** महाराष्ट्र सरकारची मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. गेल्या काही महिन्यांपासून हजारो लाभार्थी महिलांच्या खात्यात मासिक हप्ता जमा न झाल्याने संभ्रम निर्माण झाला होता. आता ई-केवायसीतील तांत्रिक अडचणी दूर केल्यानंतर थकीत हप्ते एकत्रित मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे




योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा १ हजार ५०० रुपये थेट बँक खात्यात जमा होतात. मात्र डिसेंबर २०२५ पासून अनेक महिलांचे हप्ते थांबले. ई-केवायसी प्रक्रियेदरम्यान आधार क्रमांक, बँक तपशील किंवा इतर वैयक्तिक माहिती चुकीची नोंदवली जाणे, ओटीपी पडताळणी अयशस्वी होणे किंवा अर्ज अपूर्ण राहणे ही प्रमुख कारणे समोर आली. काही प्रकरणांमध्ये बँक खात्याशी आधार लिंक नसल्यानेही व्यवहार प्रलंबित राहिले.

डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च असे सलग चार महिने हप्ता न मिळालेल्या महिलांना प्रत्येकी एक हजार पाचशे रुपये प्रमाणे एकूण सहा हजार रुपये एकत्र मिळू शकतात, अशी चर्चा आहे. यापूर्वीही तांत्रिक कारणांमुळे रखडलेले हप्ते एकत्रित जमा करण्यात आले होते. त्यामुळे या वेळीही मार्चअखेरपर्यंत थकीत रक्कम वर्ग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र याबाबतची अधिकृत घोषणा अद्याप झालेली नाही.

राज्य सरकारने ई-केवायसी दुरुस्तीसाठी ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदत दिली आहे. लाभार्थींनी अधिकृत संकेतस्थळावर किंवा नजीकच्या सेवा केंद्रात जाऊन केवायसी पूर्ण करणे आवश्यक आहे. आधार-बँक लिंक तपासणे, नाव-आडनावातील तफावत दुरुस्त करणे आणि मोबाईल क्रमांक अद्ययावत ठेवणे महत्त्वाचे आहे. ठराविक मुदतीत प्रक्रिया पूर्ण न केल्यास लाभ कायमस्वरूपी बंद होऊ शकतो. महागाईच्या पार्श्वभूम ीवर कुटुंबाच्या दैनंदिन खर्चात मदत म्हणून ही योजना अनेक महिलांसाठी आधार ठरली आहे. ग्रामीण आणि निम्न-आर्थिक गटातील महिलांसाठी हा नियमित आर्थिक स्रोत महत्त्वाचा आहे. त्यामुळे तांत्रिक कारणांमुळे लाभ थांबू नये, यासाठी प्रशासनाने सुलभ आणि पारदर्शक यंत्रणा उभी करण्याची गरज अधोरेखित होत आहे. मार्चअखेरपर्यंत परिस्थिती स्पष्ट होण्याची अपेक्षा आहे.

## भाजपकडून अमोल बालवडकरांसह ६९ जणांना ६ वर्षांसाठी बाहेरचा रस्ता

**पुणे, ता. ११ :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षशिस्तीला तडा देणाऱ्यांविरोधात भारतीय जनता पक्षाने पुण्यात मोठी कारवाई केली आहे. पक्षाच्या अधिकृत उमेदवारांविरोधात बंडखोरी करणारे किंवा विरोधी उमेदवारांना मदत केल्याचा आरोप असलेल्या तब्बल ६९ पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे. शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी ही घोषणा करत पक्षविरोधी कारवाया सहन केल्या जाणार नाहीत, असा स्पष्ट इशारा दिला.



यामध्ये कोथरूडमधील अमोल बालवडकर यांच्यासह विविध म तदारसंघांतील कार्यकर्त्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, सर्वाधिक कारवाई हडपसर मतदारसंघात झाली असून तेथील १९ जणांना निलंबित करण्यात आले आहे. त्यापाठोपाठ खडकवासला आणि पुणे कॅन्टोन्मेंटम धील प्रत्येकी ९ वडगावशेरीतील ८, शिवाजीनगरमधील ७, कोथरूड व कसबा पेठेतील प्रत्येकी ६ आणि पर्वतीतील ४ जणांवर कारवाई करण्यात आली आहे.

या कारवाईमागे उमेदवारी वाटपातील नाराजी हा मुख्य मुद्दा असल्याचे दिसते. पुण्यात भाजपच्या तिकिटासाठी सुमारे अडीच हजार इच्छुकांनी अर्ज केले होते. मात्र, जागा वाटपाचे समीकरण, मित्रपक्षांसोबतची तडजोड आणि अलीकडेच पक्षात प्रवेश केलेल्या काही नेत्यांना दिलेले प्राधान्य यामुळे अनेक जुन्या कार्यकर्त्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. या असंतोषातून काहींनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवली, तर काहींनी अधिकृत उमेदवारांविरोधात प्रचार केला.


राजकीयदृष्ट्या ही कारवाई म हत्त्वाची मानली जाते. निवडणुकीत अंतर्गत बंडाळीमुळे मतविभाजन होऊन पक्षाला फटका बसू शकतो. त्यामुळे संघटनशक्ती टिकवण्यासाठी आणि भविष्यातील निवडणुकांसाठी कडक संदेश देण्याचा भाजपचा प्रयत्न असल्याचे जाणकारांचे मत आहे. विशेष म्हणजे, निलंबितांपैकी काहींनी आधीच पक्षाशी संबंध तोडल्याची चर्चा आहे.

पुण्यातील राजकारणात ही घडामोड आगामी काळात नवे समीकरण घडवू शकते. नाराज गट स्वतंत्र राजकीय भूमिका घेतो की पुन्हा मुख्य प्रवाहात येतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## वारजे माळवाडी पोलिसांची फटाका सायलेंसर विरोधात धडक कारवाई; १५ बुलेट दुचाकी जप्त

**अमित मुंडीक**

पुणे, ता. ११ : वारजे माळवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत बुलेट दुचाकींना मॉडिफाय केलेले व फटाके वाजविणारे सायलेंसर बसवून ध्वनीप्रदूषण करणाऱ्या चालकांविरोधात पोलिसांनी परिणामकारक कारवाई केली. नागरिकांकडून वारंवार तक्रारी प्राप्त झाल्यानंतर १० फेब्रुवारी २०२६ रोजी ही विशेष मोहीम राबविण्यात आली.



वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश बोळकोटगी यांच्या आदेशानुसार पोलीस उपनिरीक्षक संजय नरळे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक नेमण्यात आले. वारजे, कर्वेनगर व शिवणे परिसरात पेट्रोलिंग करून मॉडिफाय सायलेंसर लावून शांततेचा भंग करणाऱ्या १५ बुलेट दुचाकी चालकांविरुद्ध वाहतूक विभागाच्या मदतीने कारवाई करण्यात आली. संबंधित दुचाकींचे सायलेंसर जप्त करण्यात आले.

चौकशीदरम्यान संबंधित चालकांनी हे सायलेंसर वारजे येथील रॉयल बाईक सर्विस या गॅरेजमध्ये बसविल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी गॅरेजवर छापा टाकला असता मालक योगेश दामोदर सपकाळ (वय ३३) हे मॉडिफाय व फटाके वाजविणारे सायलेंसर बसविताना आढळून आले.

त्यांच्याविरुद्ध वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ४३/२०२६ दाखल करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता कलम २२३, २७०, ४९, मोटार वाहन कायदा कलम १९०(२) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) (३) सह १३५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. दरम्यान, जप्त केलेले मॉडिफाय सायलेंसर आरएमडी कॉलेजसमोर रोड रोलरखाली चकणाचूर करण्यात आले. तसेच संबंधित दुचाकी चालकांचे समुपदेशन करण्यात आले. ही कारवाई पोलीस आयुक्त अमितेशकुमार व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## कृषिराज चौधरी यांची कर्मभूमी नायगावच हे जनतेने मतदानातून केले सिद्ध : अमोल चौधरी

### कोरेगाव मूळ गणात नायगाव ठरले किंगमेकर

**उरुळी कांचन, ता. ११ :** कोरेगाव मूळ पंचायत समितीच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार कृषिराज चौधरी यांना पराभूत करण्यासाठी तालुक्यातील काही मातब्बर नेत्यांनी अदृश्य ताकद लावल्याचा गंभीर आरोप हनुमंतराव चौधरी काळभैरवनाथ नागरी सहकारी पतसंस्थेचे संचालक अमोल चौधरी यांनी केला आहे. सत्ता, पैसा आणि दबाव यांचा खेळ करूनही जनतेच्या मतांवर डल्ला मारता आला नाही, असा घणाघात करत त्यांनी या निवडणुकीत नायगावनेच किंगमेकरची निर्णायक भूमिका बजावल्याचा ठाम दावा केला.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्व भूमीवर कोरेगाव मूळ-केसनंद गटात राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना नागरिकांकडून उत्स्फुर्त आणि भक्कम प्रतिसाद मिळाल्याचे चित्र होते.

नायगावमध्ये काही विरोधकांनी बाहेरचा उमेदवार असा अपप्रचार करत वातावरण ढवळून काढण्याचा प्रयत्न केला. उमेदवार सोरतापवाडीत राहतो, त्यामुळे तो बाहेरचा आहे, अशी भाषा वापरून मतदारांची दिशाभूल करण्यात आली. मात्र नायगावच्या स्वाभिमानी जनतेने हा खोटारडेपणा ठामपणे फेटाळून लावला. उमेदवार कुठे राहतो यापेक्षा त्याची कर्मभूमी आणि जनतेशी असलेली नाळ महत्त्वाची असते. कृषिराज चौधरी यांची कर्मभूमी नायगावच आहे, हे जनतेने मतदानातून सिद्ध केले, असे चौधरी म्हणाले.




प्रत्येक तरुणाने मी उमेदवार म्हणून केलेल्या कामाचा प्रामाणिक आढावा घेतला. गावागावात जाऊन राबवलेल्या विकासकामांची पावती जनतेने मतदानातून दिली. विरोधकांनी कितीही अफवा पसरवल्या तरी मतदारांनी विकासाच्या मुद्द्यावरच शिक्कामोर्तब केले, असा दावा त्यांनी केला. निवडणुकी दरम्यान बाहेरील बोगस मतदान झाले होते; मात्र कोरेगाव मूळ गणातील जागरूक नागरिकांनी लोकशाहीवरील विश्वास अबाधित ठेवत कोरेगाव मूळ गणातून कृषिराज चौधरी यांच्या पाठीशी उभे राहिले.तालुक्यातील काही प्रभावशाली नेत्यांनी पडद्यामागून डावपेच रचले, संघटनांवर दबाव टाकला आणि मतविभाजनाचे कारस्थान केले. ही केवळ निवडणूक नव्हती; ही स्थानिक अस्मिता आणि विकासनिष्ठ राजकारणाची निर्णायक लढाई होती. आरोग्य, पाणीपुरवठा, रस्ते, वीज, शेती, महिला सक्षम ीकरण आणि समाजकल्याण या मूलभूत प्रश्नांवर राष्ट्रवादीच्या उम ेदवारांनी मांडलेली ठोस भूमिका मतदारांच्या पसंतीस उतरली.

या निकालानंतर तालुक्याच्या राजकारणात नायगावचा आवाज अधिक बुलंद झाल्याचे स्पष्ट झाले आहे. सत्तेच्या म क्तेदारीला आव्हान देत सामान्य कार्यकर्त्यांच्या बळावर उभा राहिलेला हा लढा भविष्यातील राजकीय समीकरणे बदलणारा ठरणार, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

दरम्यान, नायगावने दिलेला कौल हा केवळ एका उमेदवाराचा विजय नसून स्वाभिमान आणि विकासनिष्ठ राजकारणाचा विजय असल्याचा पुनरुच्चार अमोल चौधरी यांनी केला.

# उरुळी कांचन येथे कंटेनर अंगावरून गेल्याने शेतकऱ्याचा जागीच मृत्यू तर तिघेजण जखमी

**उरुळी कांचन, ता. ११ :** पुणे-सोलापूर महामार्गावरील उरुळी कांचन पोलीस स्टेशन समोर मालवाहतूक पिकअपला मागून भरधाव वेगात येणाऱ्या अज्ञात कँटेनरने जोरदार धडक दिली. या धडकेत पिकअप मधील एकाचा जागीच मृत्यू झाला, तर त्याच्या पत्नीसह तिघे जण गंभीर जखमी झाले आहेत. बुधवारी (ता. ११) पहाटे पावणे पाचच्या सुमारास हा अपघात झाला. अपघातानंतर कंटेनर चालक घटनास्थळावरून फरार झाला.

या अपघातात किसन बजरंग खंडाळे (वय-४६, रा. घोटी, ता. करमाळा) यांचा जागीच मृत्यू झाला. तर त्यांच्या पत्नी लता किसन खंडाळे (वय-४२), मुलगा सुरज किसन खंडाळे (वय -२४) आणि पिकअप चालक लक्ष्मण ननवरे (वय - २६, सर्व रा. घोटी, ता. करमाळा) हे तिघे गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, चौघेही करमाळा तालुक्यातील घोटी येथील शेतकरी असून कुटुंब फुले विक्रीसाठी पुण्यातील गुलटेकडी मार्केट येथे गेले होते. विक्री करून माघारी परतताना पिकअपमध्ये चालकासह चार जण प्रवास करत होते. त्यापैकी दोन जण वाहनाच्या मागील बाजूस बसले होते.

उरुळी कांचन येथील चौकाजवळ येताच चालकाला रस्त्यावरील स्पीड ब्रेकरचा अंदाज न आल्याने अचानक ब्रेक मारावा लागला. त्याच वेळी मागून येणाऱ्या अज्ञात कंटेनरने पिकअपला जबर धडक दिली. धडकेमुळे मागे बसलेले




किसन खंडाळे रस्त्यावर फेकले गेले आणि कंटेनरच्या चाकाखाली आले. या अपघातात किसन बजरंग खंडाळे यांचा चेंदामेंदा झाला व त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर तिघेजण जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच उरुळी कांचन पोलीस ठाण्यातील कर्मचारी, कस्तुरी म्बुलन्सचे चालक संतोष झोंबाडे, माऊली लाड, रतन चव्हाण तसेच कदम ॲम्बुलन्सचे वैभव कदम यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तातडीने उरुळी कांचन येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. दरम्यान, पुणे-सोलापूर महामार्गावरील उरुळी कांचन चौकात वारंवार अपघात होत असून नागरिकांना चौक ओलांडताना जीव मुठीत धरावा लागत आहे. या चौकातील धोकादायक परिस्थितीमुळे स्थानिक नागरिकांत संताप व्यक्त होत आहे. प्रशासनाने तातडीने सुरक्षेच्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

**महामार्गाचे काम पाहणाऱ्या ठेकेदाराचे दुर्लक्ष..**

सदर पुणे -सोलापुर महामार्गाचे काम एका ठेकेदाराला देण्यात आले असून यापूर्वीही ग्रामपंचायत प्रशासन व उरुळी कांचन पोलिसांनी त्याच्याकडे पाठपुरावा करून या चौकात योग्य दिशादर्शक फलक, प्रकाशयोजना आणि स्पीड ब्रेकरवरील पांढरे पट्टे मारण्याची मागणी केली होती. अशी माहिती ग्रामपंचायत व उरुळी कांचन पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांनी दिली. गतिरोधक स्पष्ट दिसत नसल्याने वारंवार अपघात होत आहेत. महामार्गाचे काम पाहणाऱ्या ठेकेदाराच्या दुर्लक्षामुळे हा गतिरोधक मृत्यूचा सापळा बनल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. गतिरोधक असलेल्या ठिकाणी पांढरे पट्टे मारून माहिती फलक लावण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## संक्षिप्त



### खराडी आणि वाघोलीत पोलिसांच्या वर्दीत पैसे मागणारी टोळी सक्रीय

**पुणे, ता. ११ :** पुणे शहरातील खराडी आणि वाघोली परिसरात पोलिसांच्या गणवेशात काही लोक पैसे मागत फिरत असल्याचा दावा सोशल मीडियावर समोर आला आहे. विनीथ के. नावाच्या एका एक्स वापरकर्त्याने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करत याबाबत पोस्ट केले आहे. पोस्टनुसार, सकाळच्या कार्यालयीन वेळेत हे लोक पोलिस कल्याण किंवा धर्मादाय संस्थांच्या नावाखाली पैसे मागतात, परंतु त्यांच्याकडे कोणतेही अधिकृत ओळखपत्र नसते. विनीथ के. म्हणतो की, हा प्रकार गेल्या काही वर्षांपासून सुरू असून त्याचे स्वरूप कालांतराने बदलले आहे. सोशल मीडियावर अनेक नेटकऱ्यांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. काहींनी सांगितले की, पूर्वी हे लोक खोटा वॉरंट दाखवून किंवा खोटा गुन्हा सांगत लोकांना भडकवत मनोरंजन करत असत. आता मात्र थेट पैसे मागण्याचे प्रकार दिसत आहेत. त्यामुळे देणगी देण्यापूर्वी योग्य पडताळणी करणे गरजेचे आहे, असे नागरिकांमध्ये सल्ला दिला जात आहे.काही नागरिकांनी अमनोरा आणि मगरपट्टा परिसरातही अशाच प्रकारच्या लोकांचा वावर पाहिल्याचे सांगितले आहे

### महापालिकेचे 'टेंडर' मिळवून देण्याचा बहाण्याने ११ लाखांची फसवणूक

**पिंपरी, ता. ११ :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे झाडे लावण्याचे टेंडर मिळवून देतो असे सांगून एका तरुणाची ११ लाख ६१ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आली. ही घटना २० एप्रिल २०२४ ते १४ सप्टेंबर २०२४ दरम्यान भोसरीत घडली. याप्रकरणी ३२ वर्षीय तरुणाने भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार म हापालिकेच्या उद्यान विभागातील मजुराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने फिर्यादीचा विश्वास संपादन करून टेंडर मिळवण्यासाठी वेळोवेळी १७ लाख ४९ हजार रुपये घेतले. त्यापैकी फक्त ५ लाख ८८ हजार रुपये परत केले. टेंडर मिळाल्याचे खोटे सांगून आरोपीने बनावट पत्राची प्रत फिर्यादीला दिली आणि त्यांची फसवणूक केली. भोसरी पोलीस तपास करत आहेत.

### थेरगाव येथे सव्वा लाखाची घरफोडी

**पिंपरी, ता. ११ :** बंद घराचे कुलूप बनावट चावीने उघडून अज्ञात चोरट्याने सोन्या-चांदीचे दागिने आणि रोकड लंपास केली. ही घटना थेरगाव येथे घडली. याबाबत देव विजय लोट (वय १९, कैलास नगर, थेरगाव) यांनी काळेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. राहुल हरीश हरिजन उर्फ लोट (वय-२६, थेरगाव. मूळ रा. राजस्थान) याला पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी देव हे शुक्रवारी सकाळी सहा वाजता त्यांच्या घराला लॉक लावून कामासाठी भोसरी येथे गेले होते. या संधीचा फायदा घेत चोरट्याने घराचे कुलूप बनावट चावीच्या साहाय्याने उघडून आत प्रवेश केला. घरातून ७ ग्रॅम सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने आणि ३० हजार रुपये रोख असा एकूण १ लाख २३ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. देव हे सायंकाळी पाच वाजता घरी आले असता हा प्रकार उघडकीस आला. काळेवाडी पोलीस तपास करत आहेत.

### मोशीत कुरिअर कंपनीची दिशाभूल करून सोन्याची बिस्किटे लंपास

**पिंपरी,ता. ११ :** मौल्यवान पार्सल बदलून देऊन एका व्यक्तीने डिलिव्हरी बॉयची आणि कुरिअर कंपनीची तीन लाख सहा हजार रुपयांची फसवणूक केली. ही घटना मोशी परिसरात घडली. याप्रकरणी ३१ वर्षीय तरुणाने एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार एकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे डिलिव्हरी देण्यासाठी गेले होते. आरोपीने बनावट नाव आणि मोबाईल नंबरचा वापर करून कंपनीची दिशाभूल केली. त्याने सोन्याच्या बिस्किटांचे मूळ पार्सल बदलून त्याऐवजी बनावट पार्सल देऊन ८ ग्रॅम आणि १० ग्रॅमची सोन्याची दोन बिस्किटे लंपास केली.

### पत्नीला कोयत्याचा धाक दाखवत जीवे मारण्याची धमकी

**पिंपरी, ता. ११ :** पत्नीकडे सोन्याचे दागिने आणि पैशांची मागणी करत पतीने तिला दगडाने मारून गंभीर जखमी केले. ही घटना बोपखेल परिसरात घडली. या प्रकरणी पत्नीने दापोडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पतीसह सासरे, दोन दिरांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी घरात असताना पतीने सोने आणि पैशांच्या कारणावरून वाद घातला. त्याने फिर्यादीच्या डोक्यात आणि पायावर दगड मारून त्यांना गंभीर जखमी केले. कोयत्याचा धाक दाखवून धमकावले. इतर आरोपींनी देखील त्यांना शिवीगाळ करत दगडाने व हाताने बेदम मारहाण केली.

# राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला २३ फेब्रुवारीपासून सुरूवात

## ६ मार्चला अर्थसंकल्प मांडला जाणार

**मुंबई, ता. ११ :** नुकताच केंद्राने देशाचा वार्षिक अर्थसंकल्प सादर केल्यानंतर आता महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला फेब्रुवारीपासून सुरूवात होणार आहे. राज्याचा अर्थसंकल्प मार्च रोजी सादर केला जाणार असून, हे अधिवेशन मार्चपर्यंत सुरू राहणार आहे. अजित पवार यांच्या विमान अपघातात झालेल्या अकाली निधानामुळे अर्थसंकल्प राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सादर करतील.

विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे आणि विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत विधानपरिषद व विधानसभा कामकाज सल्लागार समितीची बैठक पार पडली. या



बैठकीत अर्थसंकल्पीय अधिवेशनाची रूपरेषा निश्चित करण्यात आली.

त्यानुसार राज्य विधिमंडळाच्या मुंबईत होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे कामकाज सोमवार, २३ फेब्रुवारी ते बुधवार, २५ मार्च २०२६ पर्यंत चालणार आहे. ६ मार्च रोजी अर्थसंकल्प मांडण्यात येणार आहे. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी दोन्ही सभागृहांमध्ये अजित पवार यांच्या निधानाचा शोक प्रस्ताव मांडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

अधिवेशन काळात शनिवार, २८ फेब्रुवारी रोजी शासकीय सुट्टीच्या दिवशी विधिमंडळाचे कामकाज सुरूच असणार आहे. मात्र, सोमवारी २ मार्च रोजी होळी आणि ३ मार्च रोजी धूलिंवदन असल्याकारणाने कामकाज होणार नाही. १९ मार्चला गुढीपाडव्याची सार्वजनिक सुट्टी असल्याने या दिवशी कामकाज होणार नाही. २० मार्चला देखील विधिमंडळाचे कामकाज होणार नाही. दरम्यान, या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री चंद्रकांत पाटील, मंत्री छगन भुजबळ व इतर मान्यवर उपस्थित होते.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी घेतली पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट

**नवी दिल्ली, ता. ११ :** राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आज दिल्ली दौऱ्यावर आहेत. काल उपमुख्यमंत्रीपदाचा कारभार स्वीकारल्यानंतर आज त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट घेतली. यानंतर त्या अमित शाह यांनाही भेटणार आहेत. यावेळी त्यांच्यासोबत पार्थ पवार, जय पवार यांच्यासह प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे देखील उपस्थित आहेत.

विशेष म्हणजे, सुनेत्रा पवारांच्या आधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिल्लीत गेले होते, तेथे त्यांनी वरिष्ठ नेत्यांची भेट घेतली होती. यात राष्ट्रवादीच्या विलीनीकरणवर चर्चा झाल्याची माहिती समोर येत आहे. जर राष्ट्रवादीचे विलीनीकरण झाले, तर महाराष्ट्राच्या राजकारणात एक नवा अध्याय सुरू होईल.

याशिवाय सुनेत्रा पवार आज उपराष्ट्रपतींची भेट घेऊन राज्यसभा




सदस्यत्वाचा राजीनामा देणार आहेत. सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यामुळे त्यांची राज्यसभेची जागा रिक्त झाली आहे. या जागेवर आता कोणाची वर्णी लागणार, याकडे सर्वांचे लक्ष आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या भवितव्याच्या दृष्टीने आजचा दिवस अत्यंत निर्णायक मानला जात आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या दिल्ली दौऱ्यामुळे दोन्ही राष्ट्रवादीचे विलीनीकरण होणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# पुरंदर विमानतळ प्रकल्पाला राज्य शासनाची मान्यता

**पुणे, ता. ११ :** पुरंदर येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाला राज्य शासनाने मान्यता दिल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर केली. या प्रकल्पासाठी आवश्यक जमीन अधिग्रहण प्रक्रिया १ जून २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.



पुणे व पश्चिम महाराष्ट्राच्या दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा आणि दूरगामी परिणाम करणारा निर्णय असल्याचे सांगत पुण्याचे खासदार तथा केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. मोहोळ म्हणाले, वाढती एअर कनेक्टिव्हिटी ही उद्योग, व्यवसाय, आयटी क्षेत्र, पर्यटन तसेच कृषी निर्यातीसाठी निर्णायक ठरणार आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळानंतर पुरंदर विमानतळ हा पुणे आणि पश्चिम महाराष्ट्रासाठी मोठा पर्याय उपलब्ध होणार असून, वाढत्या प्रवासी व मालवाहतूक क्षमतेला मोठी चालना मिळणार आहे.

तसेच आंतरराष्ट्रीय कनेक्टिव्हिटीच्या दृष्टीने मध्य पूर्व, युरोप, दक्षिण-पूर्व आशिया आदी महत्त्वाच्या जागतिक मार्गांशी थेट हवाई संपर्क प्रस्थापित होण्यास मदत होईल, ज्यामुळे निर्यात, परकीय गुंतवणूक आणि जागतिक व्यवसाय संधींना नवी दालने खुली होतील. पुरंदर विमानतळामुळे लॉजिस्टिक्स, वेअरहाऊसिंग, एमएसएमई उद्योग, तसेच कृषी उत्पादनांच्या जलद वाहतुकीला गती मिळून शेतकऱ्यांनाही थेट बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. रोजगारनिर्मिती, पायाभूत सुविधा विकास आणि गुंतवणूक वाढीसाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरेल, असा विश्वासही मोहोळ यांनी व्यक्त केला.

दरम्यान, राज्य व केंद्र शासनाच्या समन्वयातून पुरंदर विमानतळ प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असेही मोहोळ यांनी स्पष्ट केले.

# पुणे शहरातील भाजपचे ६९ बंडखोर सहा वर्षांसाठी निलंबित

**पुणे, ता. ११ :** राज्यात नुकत्याच पार पडलेल्या महापालिका निवडणुकीत पक्षातील अनेकांनी बंडखोरी केली. त्यामुळे अधिकृत उमेदवारांविरधात निवडणूक लढवणाऱ्या बंडखोरांवर पक्षाने कारवाईचा बडगा उगारला आहे. पुणे शहरातील ६९ कार्यकर्त्यांना सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली आहे.

निलंबित करण्यात आलेल्या कार्यकर्त्यांना पक्षातून सहा वर्षांसाठी दूर ठेवण्यात येणार असून, त्यांच्यावर संघटनात्मक जबाबदारी किंवा पदे दिले जाणार नाहीत, असे स्पष्ट करण्यात आले आहे. भाजपच्या अधिकृत उमेदवारांविरोधात अपक्ष किंवा इतर पक्षांच्या माध्यमातून



निवडणूक लढवणाऱ्या कार्यकर्त्यांवर पक्षशिस्तीचा भंग केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. या निर्णयामुळे पुणे शहरात मोठी खळबळ उडाली आहे. भविष्यातही कुठल्याही पदाधिकारी किंवा कार्यकर्त्याने पक्षविरोधी भूमिका किंवा पक्षशिस्तीचा भंग केल्यास त्यांच्यावर देखील कठोर कारवाई केली जाणार असल्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.

भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची सही असलेल्या पत्रात भारतीय जनता पार्टी प्रदेशाध्यक्ष श्री, रविंद्रजी चव्हाण साहेब यांच्या आदेशानुसार भारतीय जनता पार्टीच्या विरोधात निवडणूक लढविलेल्या कार्यकर्त्यांचे पुढील सहा वर्षाकरिता पार्टीमधून निलंबन करण्यात आले आहे. पक्षशिस्त भंग करणाऱ्यांबाबत कोणतीही सहानुभूती न दाखवण्याचा निर्धार पक्षाने स्पष्ट केला आहे, असे पत्रात नमूद करण्यात आलेले आहे.

# पत्ता विचारण्याचा बहाणा करून मंगळसूत्र लंपास करणारे तिघे जेरबंद

**दौंड, ता. ११ :** दौंडकडे कोणता रोड जातो, असा पत्ता विचारण्याचा बाहाणा करून दीड लाख रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेणाऱ्या तिघांना दौंड पोलिसांनी मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले. हि घटना वाटलुज (ता. दौंड) येथे मंगळवारी (ता. १०) दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास घडली होती.

अनिकेत बाळु खंडाळे (रा. तांदुळवाडी ता. दौंड), अतुल रघुनाथ जगताप (रा. डोर्लेवाडी ता. बारामती), सुरेश संजय वायकर (रा. बांदलवाडी ता. बारामती) अशी सोनसाखळी चोरट्यांची नावे आहेत. त्यांच्याकडून चोरीस गेलेला मुद्देमाल शंभर टक्के हस्तगत करण्यात आला असून गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकलही जप्त करण्यात आली आहे. याप्रकरणी सुरेखा संपत कोपनर (वय ४०, व्यवसाय-मजुरी, रा. मलठण, ता. दौंड, जि. पुणे) यांनी दौंड पोलीस




ठाण्यात फिर्याद दिली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सुरेखा कोपनर मंगळवारी दीड वाजण्याच्या सुम ारास वाटलुज येथे गावावरून घरी जाण्यासाठी रस्त्यावर उभ्या होत्या. त्यावेळी आरोपी अनिकेत खंडाळे, अतुल जगताप, सुरेश वायकर यांनी दौंडकडे जाणारा रस्ता विचारण्याचा बहाणा केला. पत्ता विचारत जवळ येऊन आरोपींनी फिर्यादींच्या गळ्यातील सुमारे १ तोळा वजनाचे व १ लाख ५० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र जबरदस्तीने ओढून हिसकावले व मोटारसायकलवरून पळ काढला. घटनेची माहिती मिळताच दौंड पोलिसांनी तात्काळ पथक रवाना केले. मलठण गावातील स्थानिक नागरिकांच्या मदतीने आरोपींना पकडण्यात यश आले. चोरीस गेलेले मंगळसूत्र १०० टक्के हस्तगत करण्यात आले असून गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार सागर म्हेत्रे करीत आहेत.

# खासगी स्लीपर कोचमध्ये अल्पवयीन मुलीवर अत्याचार; पॉस्को अंतर्गत गुन्हा दाखल


सागर घरत

करमाळा, ता. ११ : खासगी स्लीपर कोच बसमधून प्रवास करणाऱ्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना करमाळा पोलिस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली आहे. प्रवासी झोपेत असताना हा प्रकार घडल्याचे समोर आले असून या घटनेमुळे खासगी प्रवासी वाहतुकीतील सुरक्षेच्या उपाययोजनांवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

या प्रकरणी सुमारे ३५ वर्षीय संशयिताला अटक करण्यात आली असून त्याच्याविरुद्ध बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक (पॉस्को) कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न्यायालयाने आरोपीला पोलिस कोठडी सुनावली असून पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित मुलगी आपल्या कुटुंबासोबत खासगी स्लीपर कोचमधून प्रवास करत होती. रात्रीच्या वेळी बहुतेक प्रवासी झोपेत असताना अत्याचाराचा प्रकार घडल्याचा आरोप आहे. घटना उघडकीस येताच कुटुंबीयांनी तात्काळ पोलिसांशी संपर्क साधला. प्राथमिक चौकशीनंतर प्रकरण करम ाळा पोलिसांकडे वर्ग करण्यात आले.

स्लीपर कोचमध्ये वर-खाली बर्थ, पडदे आणि स्वतंत्र कप्प्यासारखी मांडणी असते. त्याम ुळे बसमध्ये नेमके काय सुरू आहे,



यावर चालक किंवा कर्मचाऱ्यांचे लक्ष राहत नाही. प्रवासी झोपल्यानंतर देखरेख जवळपास शून्य होते, ज्याचा गैरफायदा घेतला जाऊ शकतो. अनेक खासगी बसमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा नसते किंवा ती कार्यरत नसल्याचे आढळते. बसमध्ये सीसीटीव्ही अनिवार्य करण्याचे नियम असले तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याची बाब समोर येते.

**कर्मचाऱ्यांची पडताळणी**

चालक, क्लिनर व इतर कर्मचाऱ्यांची नियमित पोलिस पडताळणी केली जाते का, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. तसेच सहप्रवाशांविषयी कोणतीही पूर्व माहिती नसल्याने प्रवाशांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढीस लागते.

**आपत्कालीन तक्रार यंत्रणेचा अभाव**

प्रवासादरम्यान आपत्कालीन परिस्थितीत तक्रार नोंदवण्यासाठी स्पष्ट सूचना, हेल्पलाईन क्रमांक किंवा तत्काळ प्रतिसाद देणारी यंत्रणा अनेकदा उपलब्ध नसते. विशेषतः महिला व अल्पवयीन प्रवाशांसाठी स्वतंत्र सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वांची गरज व्यक्त होत आहे. खासगी ट्रॅव्हल्सवर परिवहन विभागाचे नियंत्रण असले तरी प्रत्यक्ष तपासणी व निरीक्षण कितपत प्रभावी आहे, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. परवाना देताना व नूतनीकरण करताना सुरक्षा निकषांची सक्तीने अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

दरम्यान, आरोपीविरुद्ध कठोर कारवाईची मागणी होत आहे. मात्र अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी खासगी प्रवासी वाहतुकीतील सुरक्षा व्यवस्थेत तातडीने आणि ठोस बदल करणे ही काळाची गरज असल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे.

# इंदापूरमध्ये नवीन औद्योगिक वसाहतीचा मार्ग अधिकृतपणे मोकळा

**इंदापूर, ता. ११ :** महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या रत्नपुरी मळ्यातील तब्बल एक हजार एकर जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे (एमआयडीसी) हस्तांतरित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मंत्रिमंडळाने घेतला असून, त्यामुळे इंदापूरमध्ये नवीन औद्योगिक वसाहतीचा मार्ग अधिकृतपणे मोकळा झाला आहे.



उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी पदभार स्वीकारल्यानंतर झालेल्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला, ही बाब विशेष महत्त्वाची आहे. इंदापूर तालुक्यासाठी नवीन औद्योगिक वसाहत निर्मितीचे स्वप्न दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पाहिले होते. त्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. इंदापूरचे आमदार कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनीही यासाठी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्याकडे यासाठी पाठपुरावा केला होता.

दरम्यान, या निर्णयामुळे इंदापूर, बारामती व संपूर्ण पुणे जिल्ह्यातील औद्योगिक गुंतवणुकीला गती मिळणार असून, हजारो युवकांना रोजगाराच्या संधी, स्थानिक उद्योजकतेला चालना आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवे बळ मिळणार आहे. औद्योगिक विकासाच्या दिशेने महाराष्ट्राने आणखी एक निर्णायक टप्पा गाठला असून, इंदापूर लवकरच नव्या उद्योगांचा केंद्रबिंदू म्हणून उभे राहणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# तुम्ही हिंदुत्व शिकवू नये; राज ठाकरेंचा मोहन भागवतांवर निशाणा

**मुंबई, ता. ११ :** जर सरसंघचालक मोहन भागवत यांचे मत असेल की एखाद्याच्या भाषेसाठी निषेध करणे हा रोग आहे, तर देशातील बहुसंख्य राज्ये त्याचा त्रास सहन करतात, असे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी भागवत यांच्यावर निशाणा साधत म्हटले आहे.

एक्सवरील एका पोस्टमध्ये ठाकरे यांनी दावा केला की, संघाच्या शताब्दीनिमित्त भागवत यांच्या कार्यक्रमाला उपस्थित राहिलेले लोक त्यांच्यावरील प्रेमातून नव्हे तर नरेंद्र मोदींच्या सरकारच्या भीतीमुळे आले होते. भाजपने मात्र, आरएसएस कार्यक्रमांना लोक स्वेच्छेने आणि शिस्तबद्धतेने उपस्थित राहतात, असे म्हणत त्यांच्या या वक्तव्याला नकार दिला.



मराठी भाषा आणि अस्मितेच्या मुद्द्यावर सत्ताधारी भाजपने मराठी ही अभिमानाची बाब असल्याचे म्हटले आहे, परंतु भाषा संघर्षाऐवजी संवादाचे माध्यम राहिली पाहिजे यावर भर दिला आहे. तामिळनाडू आणि कर्नाटकसारख्या दक्षिणेकडील राज्यांमध्ये प्रादेशिक भावना तीव्र असल्याचे ठाकरे यांनी नमूद केले.

पंजाब, पश्चिम बंगाल आणि अगदी गुजरातमध्येही अशीच भावना आहे. जेव्हा देशातील चार-पाच राज्यांमधील लोक वेगवेगळ्या राज्यात जातात, तिथे अहंकाराने वागतात, स्थानिक संस्कृती नाकारतात, स्थानिक भाषेचा अपमान करतात, स्वतःची मतपेढी निर्माण करतात, तेव्हा स्थानिकांमध्ये असंतोष निर्माण होतो आणि त्यामुळे संताप निर्माण होतो. भागवत याला आजार म्हणतील का? असा प्रश्न त्यांनी केला.

ठाकरे म्हणाले की, जर भागवतांना भाषा आणि राज्याबद्दल प्रेम हा एक आजार वाटत असेल, तर देशातील बहुतेक राज्ये त्याचा त्रास सहन करतात. उत्तर प्रदेश आणि बिहारमधील हजारो लोकांना तेथून हाकलून लावले गेले तेव्हा भागवत यांनी गुजरातला हे प्रवचन दिले नाही. कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल आणि पंजाबला असे धडे का दिले गेले नाहीत?.

मराठी माणूस सहिष्णू असल्याने भागवत असे वक्तव्य करण्याचे धाडस दाखवू शकतात, पण त्याहूनही अधिक म्हणजे सत्तेत असलेले कणाहीन आहेत. आमच्यासाठी मराठी भाषा आणि मराठी लोक सर्वोच्च प्राधान्याचे आहेत. भाषिक आणि प्रादेशिक ओळख या देशात राहतील आणि महाराष्ट्रातही राहतील! हा आमचा हक्क आहे आणि जेव्हा जेव्हा अशा परिस्थिती उद्भवतील तेव्हा महाराष्ट्र पूर्ण संतापाने उठेल.

तसेच, भागवतांनी हिंदुत्व शिकवू नये. जेव्हा हिंदूंवर हल्ला होतो तेव्हा मनसे हिंदू म्हणून जे काही करू शकते ते करेल. आम्ही जे चुकीचे आहे ते चुकीचे म्हणतो. देशभरात हिंदुत्वाच्या नावाखाली होणाऱ्या अराजकतेबद्दल तुम्ही कधी बोलणार?, असे ठाकरे म्हणाले.

# राज्यातील ग्रामपंचायत प्रशासक राजला उच्च न्यायालयाची स्थगिती

**पुणे, ता. ११ :** लोणी काळभोर, उरुळी कांचनसह राज्यातील जानेवारी ते डिसेंबर २०२६ दरम्यान मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याचा राज्य शासनाचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने तूर्त स्थगित केला आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील ग्रामपंचायतींना मोठा दिलासा मिळाला असून लोकशाही व्यवस्थेला मिळालेला हा महत्त्वाचा विजय मानला जात आहे.

राज्य शासनाने २३ जानेवारी रोजी परिपत्रक काढत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर निवडून आलेले प्रतिनिधी येईपर्यंत प्रशासक नेमण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना



तातडीने कार्यवाहीचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, या आदेशामुळे ग्रामपंचायतींच्या लोकशाही रचनेला धक्का बसतो, असा दावा करत अरविंद दळवी व अन्य याचिकाकर्त्यांनी न्यायालयात धाव घेतली.

या याचिकेवर न्यायमूर्ती अनिल किलोर व न्यायमूर्ती राज वाकोडे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. याचिकाकर्त्यांतर्फे ॲड. सिद्धांत घट्टे व ॲड. स्वप्निल करंजकर यांनी बाजू मांडली. ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपण्यापूर्वीच निवडणूक कार्यक्रम जाहीर करून प्रक्रिया पूर्ण करणे कायद्याने अपेक्षित असताना, वर्षभरातील सर्व ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याचा शासनाचा निर्णय मनमानी असल्याचा युक्तिवाद करण्यात आला.


कोरोना महामारीच्या काळात प्रशासक नियुक्तीचा निर्णय परिस्थितीजन्य होता; मात्र सध्या कोणतीही आपत्कालीन स्थिती नसताना असा आदेश काढणे चुकीचे असल्याचेही न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. प्राथमिक सुनावणीत शासनाच्या निर्णयामागील कारणांमुळे गैरसमज निर्माण होत असल्याचे नमूद करत न्यायालयाने ग्रामविकास विभाग व राज्य निवडणूक आयोगाला नोटीस बजावली असून, पुढील आदेश येईपर्यंत शासन निर्णयाच्या अंमलबजावणीला स्थगिती दिली आहे. पुढील सुनावणी १७ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

दरम्यान, कार्यकाळ संपताच निवडणूक घेऊन नवी कार्यकारिणी निवडून येणे ही लोकशाहीची मूलभूत प्रक्रिया आहे. वर्षभर निवडणुका न घेण्याचा शासनाचा प्रयत्न लोकशाहीविरोधी आहे, असा गंभीर आरोप याचिकाकर्त्यांनी केला आहे. उच्च न्यायालयाच्या या अंतरिम आदेशामुळे प्रशासक राजवर तात्पुरता अंकुश बसला असून, ग्रामस्वराज्याच्या अधिकारांचे रक्षण झाले असल्याची भावना राज्यभर व्यक्त होत आहे.

# अभिनेता श्रेयस तळपदे विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल

**मुंबई, ता. ११ :** चेक बाऊंन्स प्रकरणामुळे बॉलीवूड अभिनेता राजपाल यादव याच्या अडचणी वाढल्या आहेत. या प्रकरणात न्यायालयाने त्याला फटकारल्यानंतर त्याने तिहार तुरुंगात आत्मसर्मपण केले आहे. अशातच आता मराठी हिंदी चित्रपटात काम करणाऱ्या एका प्रसिद्ध अभिनेत्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आल्याने चित्रपटसृष्टीत मोठी खळबळ उडाली आहे.

अभिनेता श्रेयस तळपदे विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याच्यासह आणखी ११ जणांवर असे एकूण मिळून १२ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबतचे वृत्त एनआयएने दिले आहे. त्यामुळे



अभिनेत्याच्या अडचणी वाढल्या आहेत. १० फेब्रुवारी रोजी मैनपुरीच्या भोगांव पोलीस ठाण्यात अभिनेता श्रेयस तळपदेसह १२ जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एफआयरमध्ये एका व्यक्तीने या सर्वांवर गुंतवणुकीच्या नावाखाली लाखो रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप केला आहे. एएनआयने दिलेल्या माहितीनुसार, भोगांवच्या मोहल्ला मिश्राणा इथे राहणाऱ्या एका व्यक्तीने सिनेस्टार आणि त्याच्या साथीदारांवर गुंतवणुकीच्या नावाखाली लाखो रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप केला असल्याचे म्हटले आहे.

अभिनेत्याने त्याच्या साथीदारांसह शहरातील मिश्राना परिसरातील मुंबई बँक्केच्या शाखेत गुंतवणुकीच्या नावाखाली गावकऱ्यांची लाखो रुपयांची फसवणूक केली, असा आरोप करण्यात आला आहे. १२ व्यक्तीं मध्ये समीर अग्रवाल, सानिया अग्रवाल, आरके सेट्टी, फंड मॅनेजर संजय मुदगिल, शबाब हुसेन, श्रेयस तळपदे, नरेंद्र नेगी, पंकज अग्रवाल, सुप्रिया, अनुज जैन, अजय श्रीवास्तव आणि अरविंद त्रिपाठी यांचा समावेश आहे. न्यायालयाच्या आदेशानंतर पोलिसांनी याप्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

**याअगोदरही विविध प्रकरणामुळे चर्चेत**

या प्रकरणापूर्वी २०२५ मध्येही अभिनेता श्रेयस तळपदेचे नाव एका फसवणुकीच्या प्रकरणात समोर आले होते. अजूनही काही प्रकरणात त्याच्यावर आरोप ठेवण्यात आले आहेत. २०२५मध्येच श्रेयस तळपदेचे नाव एका चिटफंड प्रकरणातही समोर आले होते आणि त्याच्याविरुद्ध उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि हरियाणा येथे तक्रार दाखल झाली होती. आता या नवीन प्रकरणामुळे त्याच्या अडचणीत आणखी भर पडली आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

# शेतजमीनीच्या वादातून जेष्ठ महिलेला ठार मारण्याची धमकी

## लोणी काळभोर पोलीस ठाण्यात ६ जणांवर गुन्हा दाखल

**लोणी काळभोर, ता. ११ :** शेतजमिनीवर बळजबरीने ताबा घेऊन लागवड करून जेष्ठ महिलेला शिवीगाळ करून जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली आहे. ही घटना लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील राहिंजवस्ती परिसरात असलेल्या गट क्र. ११२ मध्ये २६ जानेवारीला सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात ६ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेतजमिनीच्या वादातून ज्येष्ठ महिलेवर अन्याय झाल्याचा आरोप होत असल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

सुरेश अनंता जागडे, सौरभ सुरेश जागडे, रमेश अनंता जागडे, दत्ता अनंता जागडे, साहील दत्ता जागडे व यश रमेश जागडे (सर्व रा. कदमवाकवस्ती, संभाजीनगर, ता. हवेली) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. तर यापूर्वीदेखील आरोपींवर लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. याप्रकरणी अलका श्रीहरी जागडे (वय ६८, रा. कदम वाकवस्ती, ता. हवेली) यांनी फिर्याद दिली आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अलका जागडे यांचे पती स्व. श्रीहरी जागडे यांनी सन २००० मध्ये गणेश गेनु जागडे यांच्याकडून गट क्र. ११२ मधील सुमारे १.२० हेक्टर जमीन ९९ वर्षांच्या कराराने घेतली होती. तेव्हापासून सदर जमीन अलका जागडे व त्यांच्या कुटुंबीयांच्या ताब्यात असून गेल्या अनेक वर्षांपासून ऊसासह विविध पिकांची लागवड करण्यात येत होती. ऊसाचे उत्पादन राजगड, यशवंत सहकारी साखर कारखाना तसेच खासगी साखर कारखान्यांना पुरविण्यात आले असून त्याबाबतच्या पावत्याही त्यांनी पोलिसांकडे सादर केल्या आहेत.

दरम्यान, मार्च २०२५ मध्ये उस तोडल्यानंतर जमीन मशागत करून पुढील लागवडीची तयारी करण्यात आली होती. मात्र अवकाळी पावसा मुळे लागवड रखडली. डिसेंबर २०२५ मध्ये पुन्हा संपूर्ण क्षेत्राची नांगरणी करून ऊस लागवडीची तयारी सुरू होती. तेव्हा २६ जानेवारी रोजी आरोपींनी ट्रॅक्टर घालून जबरदस्ती कोळपणी करत शेतात पालक व कांद्याची लागवड केली. त्यानंतर फिर्यादी महिला जाब विचारण्यासाठी गेल्या असता आरोपींनी शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली आहे. याप्रकरणी अलका जागडे यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार सहाही आरोपींवर भारतीय न्याय संहिता कलम १८९ (२), ३२९ (३), ३५१ व ३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक अंकुश बोराटे करत आहेत.

## पिंपरीत विवाहित तरुणाची आत्महत्या

**पिंपरी, ता. ११ :** चिखली परिसरात राहणाऱ्या २३ वर्षीय प्रतीक संदीप घनवटे या तरुणाने आपल्या पत्नीशी फोनवर झालेल्या वादानंतर विष प्राशन करून जीवनयात्रा संपवली. मिळालेल्या माहितीनुसार, प्रतीक आणि त्याच्या पत्नीमध्ये गेल्या काही दिवसांपासून खटकेउडत होते. कौटुंबिक मतभेद इतके वाढले होते की, त्याची पत्नी त्याला सोडून माहेरी राहत होती. पत्नीला पुन्हा घरी आणण्यासाठी प्रतीक मनाची तयारी करत होता आणि तिला भेटण्यासाठी तो स्वतः गुजरातला जाणार होता. मात्र, ६ फेब्रुवारी रोजी घरातून निघण्यापूर्वी दोघांमध्ये फोनवर पुन्हा एकदा जोरदार वाद झाला. या वादाने प्रतीकच्या मनावर इतका खोलवर परिणाम केला की, रागाच्या भरात त्याने टोकाचे पाऊल उचलण्याचे ठरवले आणि विष प्राशन केले. विष घेतल्याचे समजताच कुटुंबीयांनी त्याला तातडीने पिंपरीतील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न केले, मात्र मंगळवारी उपचारादरम्यान त्याची प्राणज्योत मालवली.

### प्राईम लाईफ



## त्वचा मऊ मुलायम होण्यासाठी स्वस्त आणि मस्त केळांचा वापर करायलाच हवा

केळांचा फेसपॅक हे वाचून थोडं आश्चर्य वाटेल, परंतु मऊ मुलायम त्वचेसाठी केळांचा फेसपॅक हा खूप परीणामकारक मानला जातो. सीझन कुठलाही असो बाजारामध्ये केळी सहजसुलभ उपलब्ध असतात. उन्हामुळे आणि बदलत्या हवामानामुळे चेहरा निस्तेज होतो. कधी कधी हा कोरडेपणा आणि चेहऱ्यावरील तेलकटपणा इतका वाढतो की, दिवसातून कितीही वेळा चेहरा धुतला तरी चेहरा मऊ मुलायम होत नाही. अशावेळी घरी असलेली केळी यावर रामबाण उपाय आहे. घरामध्ये असलेल्या केळ्यांचा फेस पॅक चेहऱ्यावर लावल्यास, चेहरा मऊ मुलायम होतो.

चेहऱ्यावर चमक येण्यासाठी केळी फार गरजेची आहेत. म्हणूनच आठवड्यातून किमान एकदा तरी हा केळ्याचा फेस पॅक लावायलाच हवा.

केळी फेस पॅक

साहित्य : अर्धी पिकलेली केळी, एक चमचा क्रीम, अर्धा चमचा मध

अर्धी पिकलेली केळी घ्या. चमच्याने चांगले मॅश करा. क्रीम आणि मध घाला आणि सर्वकाही नीट मिसळा. ते क्रिमी होईपर्यंत मिसळा. ते तुमच्या चेहऱ्यावर लावा. १५ मिनिटे सुकूद्या. नंतर कोमट पाण्याने चेहरा धुवा. हलकेमॉइश्चरायझर लावा.

हा फेस पॅक आठवड्यातून दोनदा लावता येतो. झोपण्यापूर्वी तुमचा चेहरा पूर्णपणे स्वच्छ करा. नंतर फेस पॅक लावा. उत्तम परिणामांसाठी झोपण्यापूर्वी लावणे गरजेचे.

# महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी प्रतिबंध टास्क फोर्सची स्थापना

**मुंबई, ता. ११ :** राज्यातील शेतकरी आत्महत्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेता महाराष्ट्र सरकारने महत्त्वाचा निर्णय घेत स्वतंत्र शेतकरी आत्महत्या प्रतिबंध टास्क फोर्स स्थापन केला आहे. कृषी आयुक्त सुरज मांढरे यांनी परिपत्रकाद्वारे याची माहिती दिली. शेतकऱ्यांच्या समस्या केवळ आर्थिक नाहीत, तर मानसिक, सामाजिक आणि हवामान बदलाशी संबंधितही आहेत. या सर्व बाबींचा एकत्रित विचार करून उपाययोजना करण्याचा या कृती दलाचा उद्देश आहे. अशा प्रकारची स्वतंत्र यंत्रणा उभारणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

या टास्क फोर्सचे नेतृत्व विस्तार व प्रशिक्षण विभागाचे संचालक रफिक नाईकवाडी करणार आहेत. त्यांच्या



अध्यक्षतेखाली सुनील बोरकर, उदय देशमुख, गणेश घोरपडे, जीवन सुंदे, नंदकिशोर नाईनवाड, सत्यनित शितोळे आणि सोनाली शिळकर या अधिकाऱ्यांचा समावेश आहे. विविध विभागांमध्ये समन्वय साधून काम करण्याची जबाबदारी या समितीवर सोपवण्यात आली आहे.

या कृती दलात मानसिक आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञांचाही सहभाग आहे. शिवार फाऊंडेशनमार्फत संशोधन करणारे कृषी समाजशास्त्रज्ञ डॉ. विनायक हेगाणा तसेच महिला शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यावर काम करणाऱ्या मानसोपचारतज्ज्ञ डॉ. सुष्टी डोईजड यांची विशेष सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे या उपक्रमाला मानवी दृष्टिकोनासोबत तज्ज्ञ मार्गदर्शन मिळणार आहे.

राज्यात विविध शेतकरी कल्याणकारी योजना राबवल्या जात असल्या तरी हवामान बदल, पिकांचे नुकसान, वाढता खर्च, कर्जाचा ताण आणि बाजारातील चढउतार यामुळे शेतकरी अडचणीत येत आहेत. या पार्श्वभूमीवर आपत्तीपूर्व, आपत्तीच्या काळात आणि त्यानंतरही शेतकऱ्यांना मदत देण्याचा आराखडा तयार केला जाणार आहे.

दरम्यान, कृषी आयुक्तांनी स्पष्ट केले की, शेतकरी आत्महत्येचा प्रश्न केवळ आर्थिक मदतीपुरता मर्यादित नाही. शेतकऱ्यांना आधीच सक्षम करणे, त्यांचे उत्पन्न वाढवणे आणि मानसिक आधार देणे यावर भर दिला जाणार आहे.

## सहकारनगर पोलिसांचा अवैध हुक्का पार्लरवर छापा


**पुणे, ता. ११ :** पुणे शहरातील सहकारनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत विनापरवाना सुरू असलेल्या अवैध हुक्का पार्लरवर पोलिसांनी धाडसी कारवाई केली आहे. सोमवारी (ता. ०९) पेट्रोलिंगदरम्यान मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.

राजमुद्रा हौसिंग सोसायटीतील मेहेर लिव्हिंग बिल्डिंग शेजारी असलेल्या श्री. गुरु नानक कृपा बिल्डिंगच्या तिसऱ्या मजल्यावरील टेरेसवर अवैधरीत्या हुक्का पार्लर सुरू असल्याची माहिती पोलीस हवालदार अमोल पवार यांना मिळाली. ही माहिती तपास पथकाचे पोउनि गणेश कर्चे यांच्यामार्फत वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विठ्ठल पवार यांना कळविण्यात आली. त्यांनी तात्काळ कारवाईचे आदेश दिले.




त्यानुसार तपास पथकाने घटनास्थळी छापा टाकून लाकडी दरवाजा तोडून प्रवेश केला असता, हॉलमध्ये टेबल्स मांडलेले असून त्यापैकी टेबलांवर इसम हुक्का फ्लेवरचे सेवन करताना आढळून आले. काऊंटरवर हॉटेल मालक व वेटर उपस्थित होते.

पोलिसांनी केलेल्या तपासात हुक्का पॉट, चिलीम, विविध फ्लेवरचे साहित्य असा १२ हजार ४९५ रुपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. या प्रकरणी सहकारनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## बुधवार पेठेत मध्यरात्री पोलिसांचे कॉम्बिंग ऑपरेशन

**पुणे, ता. ११ :** बुधवार पेठ परिसरात पुणे पोलिसांनी बुधवारी मध्यरात्री व्यापक कॉम्बिंग ऑपरेशन राबवत संपूर्ण परिसराची झाडाझडती घेतली. रात्री १२ ते पहाटे ३ वाजेपर्यंत सुरू असलेल्या या कारवाईदरम्यान ५० हून अधिक घरांची तपासणी करण्यात आली तसेच प्रमुख रस्त्यांवर कडेकोट नाकाबंदी करण्यात आली.

शुक्रवारपेठपोलीसचौकीहद्दीतील कुंटणखान्यांमध्ये महिला पोलिसांच्या पथकाने महिलांची सविस्तर चौकशी केली. वेश्याव्यवसायासाठी आलेल्या काही ग्राहकांना ताब्यात घेऊन त्यांची पडताळणी करण्यात आली. अमली पदार्थांचा वापर, अल्पवयीन मुलींना जबरदस्तीने देहविक्रीत ढकलण्याचे प्रकार आणि बेकायदेशीररीत्या वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांचा मुद्दा या कारवाईचा केंद्रबिंदू होता.

मिळालेल्या माहितीनुसार, बुधवार पेठेतील वेश्यावस्तीमध्ये बेकायदा वास्तव्य करणाऱ्या एका बांगलादेशी तरुणीप्रकरणी कारवाई न केल्याच्या आरोपावरून फरासखाना पोलीस ठाण्यातील एका महिला कर्मचाऱ्याला यापूर्वी निलंबित करण्यात आले होते. वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती न देणे आणि आर्थिक व्यवहार केल्याचा ठपका तिच्यावर ठेवण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करून ही धडक मोहीम हाती घेण्यात आली. परिसरातील सर्व प्रमुख मार्गांवर नाकाबंदी करत ये-जा करणाऱ्या संशयितांची तपासणी करण्यात आली. कारवाईनंतरही परिसरात पोलिसांची गस्त वाढविण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

## चाकण येथे पैशांच्या वादातून तरुणाला मारहाण


**चाकण, ता. ११ :** पैशांच्या जुन्या वादातून झालेल्या भांडणाचा राग मनात धरून दोन व्यक्तींनी मिळून एका तरुणाला लोखंडी गजाने मारहाण केली. ही घटना चाकण येथील कोयाळीत घडली. या प्रकरणात २८ वर्षीय तरुणाने दक्षिण चाकण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने लोखंडी गजाने फिर्यादीच्या डोक्यात जोरात मारले, तर एकाने त्यांना पकडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

## शिवनेरी गडावर तरुणाचा संशयास्पद मृत्यू; ७०० फुट दरीतून ६ तासांच्या प्रयत्नांनंतर मृतदेह बाहेर

**पुणे, ता. ११ :** जुन्नर तालुक्यातील ऐतिहासिक शिवनेरी किल्ला परिसरात एका २५ वर्षीय तरुणाचा मृतदेह सुमारे ७०० फुट खोल दरीत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. मंगेश सोनवणे (वय २५, मूळ रा. ढवळपुरी, जि. अहमदनगर; सध्या रा. शिरूर) असे मृत तरुणाचे नाव असून तो एमपीएससी परीक्षेची तयारी करत होता.

दोन दिवसांपूर्वी मंगेश शिवनेरी गडावर फिरण्यासाठी आला होता. मात्र तो खाली परत न आल्याने त्याचा शोध सुरू होता. मंगळवारी सकाळी सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास अंबरखानाच्या मागील दरीत स्थानिक ग्रामस्थांना मृतदेह दिसून आला. त्यांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली.

घटनास्थळी पोलीस, वन विभाग व पुरातत्त्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी केली. दरी सुमारे



७०० फुट खोल असल्याने मृतदेह बाहेर काढणे अत्यंत धोकादायक होते. स्थानिक बचाव पथकाच्या मदतीने दोरांच्या सहाय्याने कर्मचारी दरीत उतरले. सुमारे सहा तासांच्या प्रयत्नांनंतर दुपारी अडीच वाजता मृतदेह बाहेर काढण्यात आला. मृतदेह शवविच्छेदनासाठी जुन्नर ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला असून अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. प्राथमिक तपासात कड्यावरून पडल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे. या घटनेमुळे शिवनेरी गडावरील धोकादायक ठिकाणी सुरक्षेची उपाययोजना अधिक बळकट करण्याची आवश्यकता अधोरेखित झाली आहे.

## तुरुंगातील गांधीविचारांचा निबंध ठरला निर्णायक

### अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणात शिक्षा जन्मठेपेतून १२ वर्षांवर

**मुंबई, ता. ११ :** गुन्हेगाराला केवळ कठोर शिक्षा देणे हा कायद्याचा एकमेव उद्देश नसून त्याच्या पुनर्वसनालाही तितकेच महत्त्व आहे, असे निरीक्षण नोंदवत मुंबई उच्च न्यायालयाने २०१६ मधील अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणातील दोषीची जन्म ठेपेची शिक्षा कमी करून १२ वर्षांपर्यंत मर्यादित केली आहे.

डिसेंबर २०१६ मध्ये मुंबईत पाच वर्षांच्या बालिकेवर शेजारी राहणाऱ्या २० वर्षीय तरुणाने लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली होती. पीडित बालिकेने घडलेला प्रकार पालकांना सांगितल्यानंतर पोलिसांनी आरोपीला अटक केली होती. सत्र न्यायालयाने पीडितेची साक्ष आणि इतर पुरावे ग्राह्य धरत आरोपीला जन्मठेपेची शिक्षा



सुनावली होती. या शिक्षेविरोधात आरोपीने उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्या खंडपीठाने गुन्ह्याचे गांभीर्य अधोरेखित करतानाच आरोपीच्या वयाचा आणि तुरुंगातील वर्तनाचा विचार केला. गुन्ह्याच्या वेळी आरोपीचे वय अवघे २० वर्षे होते आणि त्याच्यावर यापूर्वी कोणताही गुन्हा नोंद नव्हता, असे न्यायालयाने नमूद केले.

तसेच, गेल्या आठ वर्षांपासून तुरुंगात असताना आरोपीने विविध शैक्षणिक आणि सुधारात्मक उपक्रमांत सहभाग घेतला. विशेषतः महात्मा गांधी यांच्या विचारांवर लिहिलेल्या निबंध स्पर्धेत त्याने मिळवलेले यश न्यायालयाने त्याच्यातील सकारात्मक बदलाचे प्रतीक मानले. कोविड काळातही त्याला कोणतीही सवलत मिळाली नव्हती, याचाही उल्लेख करण्यात आला.

दरम्यान, खंडपीठाने आदेशात म्हटले आहे की, दोषीचे तरुण वय आणि स्वतःमध्ये सुधारणा घडवण्याचे प्रयत्न दुर्लक्षित करता येणार नाहीत. अशा परिस्थितीत १२ वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा न्याय्य व पुरेशी ठरेल. या निर्णयामुळे पुनर्वसन विरुद्ध कठोर शिक्षा या मुद्द्यावर पुन्हा एकदा चर्चेला उधाण आले आहे.

## ट्रिपल सीट दुचाकींवर पुणे वाहतूक पोलिसांची मोठी कारवाई

### १६ लाखांचा महसूल जमा

अमित मुंडीक

पुणे, ता. ११ : पुणे शहर वाहतूक पोलिसांनी ट्रिपल सीट दुचाकींवर मोठी धडक कारवाई करत १४५४ वाहनांवर दंडात्मक कारवाई केली असून तब्बल १६ लाख १८ हजार ४०० रुपयांचा महसूल शासनाकडे जमा केला आहे. ही विशेष मोहीम माननीय पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या आदेशानुसार तसेच सहपोलीस आयुक्त आणि अपर पोलीस आयुक्त (पूर्व प्रादेशिक विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

शहरातील प्रमुख रस्ते, महत्त्वाचे चौक आणि वाहतूक कोंडी होणाऱ्या ठिकाणी विशेष तपासणी नाकेउभारून ही कारवाई करण्यात आली. ट्रिपल सीटप्रवास करणाऱ्या दुचाकीस्वारांवर कडक कारवाई करत एकूण २१४४ चलन पेड करून घेण्यात आले. याशिवाय विविध वाहतूक नियमभंग



प्रकरणांमध्ये एकूण ५९२१ चलनांची कारवाई करण्यात आली. या मोहिमेत पुणे शहर वाहतूक विभागातील ३० वाहतूक शाखा तसेच ४४ पोलीस ठाण्यांतील अधिकारी आणि अंमलदारांनी सक्रिय सहभाग नोंदविला.


वाहतूक पोलिसांनी नागरिकांना स्पष्ट इशारा देत सांगितले की, दुचाकीवर ट्रिपल सीटने प्रवास करणे हा कायद्याने गुन्हा असून त्यामुळे अपघातांचा धोका वाढतो. अशा प्रकारच्या नियमभंगामुळे स्वतःसह इतर वाहनचालकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. पुणे शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी आणि अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी अशा विशेष मोहिमा पुढील काळातही सातत्याने राबविण्यात येणार असल्याची माहिती डीसीपी ट्रॅफिक, पुणे शहर हिम्मत जाधव यांनी दिली. नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करून पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

# वंदे मातरम् सुरू असताना उभं राहणं बंधनकारक; केंद्र सरकारकडून नवी नियमावली जाहीर

**नवी दिल्ली, ता. ११ :** वंदे मातरम् या गीताच्या रचनेला आता १५० वर्षे पूर्ण होत आहेत. या दीड शतकाच्या प्रवासाचे औचित्य साधून केंद्र सरकारने एक मोठा आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. गृह मंत्रालयाने 'वंदे मातरम्'च्या गायन आणि वादनासाठी एक नवीन नियमावली (प्रोटोकॉल) जारी केली असून, त्याचे स्वरूप आता अधिक व्यापक करण्यात आले आहे.

बंकिमचंद्र चटोपाध्याय यांनी त्यांच्या 'आनंद मठ' या कादंबरीत १८७६ मध्ये या गीताची रचना केली होती. दरम्यान, नवीन पिढीला संपूर्ण गीताची ओळख करून देण्यासाठी सरकारने हा बदल केला आहे.

१. सहा कडव्यांचे पूर्ण गायन: आतापर्यंत केवळ सुरुवातीची काही कडवी गायली जात होती. मात्र, आता सरकारी




कार्यक्रमांमध्ये संपूर्ण सहा कडव्यांसह वंदे मातरम् गाणे अनिवार्य असेल.

२. प्राधान्य क्रम: नवीन प्रोटोकॉलनुसार, ज्या कार्यक्रमात दोन्ही गीते गायली जाणार असतील, तिथे 'जन गण मन'च्या आधी 'वंदे मातरम गायले जाईल.

३. शाळांसाठी नियम: देशातील सर्व शाळांमध्ये दिवसाच्या कामाची सुरुवात या राष्ट्रगीताच्या सामूहिक गायनाने करणे आता बंधनकारक असेल.

४. उभे राहणे बंधनकारक: वंदे मातरम् सुरू असताना प्रत्येकाने सन्मानाने उभे राहणे आवश्यक आहे.

५. व्हीव्हीआयपी प्रोटोकॉल: राष्ट्रपती किंवा राज्यपालांचे आगमन, नागरी सन्मान सोहळे आणि पदवीदान समारंभात तसेच आकाशवाणी किंवा दूरदर्शनवरून राष्ट्रपतींचे भाषण सुरू होण्यापूर्वी आणि संपल्यानंतर या गीताचे वादन अनिवार्य असेल.

अनेक दशकांपासून वंदे मातरम्च्या केवळ संक्षिप्त स्वरुपात गायले जात होते. मूळ रचनेतील सर्व कडव्यांच्या गायनामुळे त्यातील ऐतिहासिक संदर्भ आणि भौगोलिक वर्णनाचा वारसा लोकांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल. विशेषतः सरकारी सोहळ्यांमध्ये शिस्त आणि एकवाक्यता आणण्यासाठी हा वेळ आणि क्रम निश्चित करण्यात आला आहे.